ePaper

## उपमुख्यंत्री फडणवीस यांच्याविरोधात आचारसंहितेचे उल्लंघन केल्याची तक्रार



| वर्ष - 6 | अंक - 315 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 2 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- पुणे जिल्हा परिषदेचे २०४ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक
- काँग्रेस-राष्ट्रवादीने सोडली ठाकरे गटाची साथ?
- ग्रीसमध्ये मृत्यूतांडव!


# ताई, नाना की दादा?

## » आज होणार फैसला : चिंचवड पोटनिवडणुकीचा निकाल...

।पिंपरी।

। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी आज होणार आहे. सकाळी आठ वाजल्यापासून मोजणीला सुरुवात होईल. निकालाची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी सुरू होण्याच्या वेळेपर्यंत प्राप्त होणाऱ्या टपाली मतदानाचीच मोजणी करण्यात येणार आहे. चिंचवडचे मैदान कोण मारणार हे सायंकाळी सायंकाळी चार पर्यंत स्पष्ट होईल.**

या निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीच्या उमेदवार अश्विनीताई जगताप, महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे आणि अपक्ष उमेदवार राहुलदादा कलाटे यांच्यात चुरस आहे. त्यामुळे ताई, नाना की दादा? कोण होणार चिंचवडचा आमदार? याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

थेरगाव येथील शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे आज मतमोजणी होणार आहे. मतमोजणीच्या एकूण ३७ फेऱ्या होणार आहेत. यासाठी प्रत्येकी १४ टेबल अधिक टपाली मतपत्रिकांसाठी १ टेबल असे एकूण १५ टेबल असणार आहेत. १८ पर्यवेक्षक, १८ सहायक आणि १८ सूक्ष्म निरीक्षकांची मतमोजणी कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे.



मतमोजणी सुरू होण्यापूर्वी मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची संगणकीय प्रणालीने सरमिसळ (रँडमायझेशन) करण्यात येणार आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेबलवरील कामकाज त्या कर्मचाऱ्यांना सोपवले जाणार आहे. सुरुवातीला टपाली मतमोजणी होईल. मतमोजणीच्या निर्धारित वेळेपर्यंत प्राप्त टपाली मतदानाची मोजणी करण्यात येईल.

मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी सुरू होण्याच्या वेळेपर्यंत प्राप्त होणाऱ्या टपाली मतदानाचीच मोजणी करण्यात येणार आहे. टपाली मतपत्रिकांसाठी आणि सर्व्हिस वोटर्ससाठीच्या इटीपीबीएससाठी (इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टीम) प्रत्येकी एक टेबल ठेवण्यात आला आहे. सर्वप्रथम टपाली आणि ईटीपीबीएसची मोजणी होईल. त्यानंतर ईव्हीएम मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीसाठी प्रत्येक टेबलवर १ मतमोजणी पर्यवेक्षक, १ मतमोजणी सहायक आणि १ सूक्ष्म निरीक्षक असे अधिकारी- कर्मचारी नेमण्यात आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी दिली.

### निकालापूर्वीच जगताप समर्थकांकडून अभिनंदनाचे फ्लेक्स...



» पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील उर्से टोल नाका आणि पिंपरी चौक, तसेच सांगवी पिंपळे गुरव परिसरात अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे आमदार पदी निवड झाल्याचे फ्लेक्स लागले आहेत. काही खासगी संस्थांनी केलेल्या सर्वेत भाजपाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप या विजयी दाखवण्यात आल्या आहेत. तसेच, भाजपाच्या स्थानिक नेत्याच्या सर्वेत अश्विनी लक्ष्मण जगताप यांनाच आमदार म्हणून पसंती मिळाल्याने काही उत्साही कार्यकर्त्यांनी थेट फ्लेक्सबाजी करत अश्विनी लक्ष्मण जगताप या आमदार झाल्याचे फ्लेक्स लावले आहेत. याआधी पुण्यात काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचेदेखील आमदार म्हणून फ्लेक्स लागले होते. त्याचेच लोण आता थेट पिंपरीत पोहोचले आहे.

# महापालिका शिक्षकांचा ताण होणार कमी!

## » प्रशासनाचा निर्णय : शिक्षण विभागात 'डाटा एन्ट्री ऑपरेटर' भरती

।पिंपरी।

। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांचा विद्यार्थ्यांना शिकविण्याऐवजी इतर प्रशासकीय कामकाज, शासनाला विविध माहिती पाठविणे, ही माहिती टाइप करून देणे, अशा विविध कामांसाठी जास्त वेळ जात आहे. त्यामुळे महापालिकेच्या शिक्षण विभागाने सर्व शाळांसाठी १०५ डाटा एन्ट्री ऑपरेटर कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांच्या एकूण १०५ प्राथमिक, तर १८ माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये ४२ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थीसंख्या मोठी असताना महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची



संख्या कमी आहे. त्यामुळे दोन महिन्यापूर्वी पालिकेने सुमारे अडीचशे कंत्राटी शिक्षकांची भरती केली. एकीकडे पालिकेचा शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबवत आहे. मात्र, सध्या शिक्षकांना शासन, पालिकेला विविध अहवाल पाठविणे, संच मान्यतेसाठी विद्यार्थ्यांचा डाटा ऑनलाइन भरणे, वैद्यकीय तपासणीची माहिती भरणे, क्रीडा विषय माहिती ठेवणे यासह विद्यार्थ्यांचा सर्व डाटा जतन करणे, संगणकावर एक्सेल शीटमध्ये माहिती भरणे यासह विविध कामे करावी लागत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविण्याऐवजी प्रशासकीय आणि इतर कामकाजात शिक्षकांचा जास्त वेळ जात आहे. मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे.

> **“ शिक्षकांचा विविध कामांसाठी बहुमूल्य असा वेळ जात आहे. याचा विचार करून पालिकेच्या सर्व शाळांसाठी १०५ डाटा एन्ट्री ऑपरेटर कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आहेत. यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी आणि त्यांना घडविण्यासाठी जास्तीत-जास्त वेळ देता येणार आहे.**
>
> **- संदीप खोत, उपायुक्त, शिक्षण विभाग.**

# पुणे जिल्हा परिषदेचे 204 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक!

## » प्रशासक असल्याने संस्थात्मक कामांवर भर

।पुणे । महाईन्यूज ।

**महापालिकेत २३ गावांचा समावेश झाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नावर मोठा परिणाम अंदाजपत्रकावर दिसून आला आहे. सन २०२३-२४ या वर्षासाठीचे जिल्हा परिषदेने २०४ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर केले. मुद्रांक शुल्कात घसरण झाल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत अंदाजपत्रक २६ कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दरवर्षी नागरिकांच्या हिताच्या नावीन्यपूर्ण योजनांचा अंदाजपत्रकात समावेश असतो, परंतु यंदा एकाही नावीन्यपूर्ण योजनेचा समावेश नाही.**



### जिल्हा परिषदेचे सन 2023-24 चे अंदाजपत्रक

»प्रशासन – एक कोटी २७ लाख ७० हजार, सामान्य प्रशासन विभाग – दोन कोटी ६८ लाख, पंचायत विभाग – २० कोटी ७६ लाख, मुद्रांक शुल्क ग्रामपंचायतींना वाटप – ७९ कोटी, वाढीव उपकर पंचायत समिती वाटप – तीन कोटी, वित्त विभाग – पाच कोटी ७६ लाख ९५ हजार, शिक्षण विभाग – दहा कोटी ७२ लाख दहा हजार, इमारत व दळणवळण (दक्षिण) – १५ कोटी १३ लाख ६० हजार, इमारत व दळणवळण (उत्तर) – १२ कोटी ९० लाख, पाटबंधारे विभाग – चार कोटी ८४ लाख, वैद्यकीय विभाग – दोन कोटी ५८ लाख, सार्वजनिक आरोग्य स्थापत्य विभाग – नऊ कोटी १५ लाख, कृषी विभाग – तीन कोटी ३२ लाख, पशुसंवर्धन विभाग – एक कोटी ३४ लाख, समाज कल्याण विभाग – २३ कोटी, महिला व बाल कल्याण विभाग – आठ कोटी ५० लाख एकूण २०४ कोटी.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आयुष प्रसाद यांनी मंगळवारी (२८ फेब्रुवारी) अंदाजपत्रक सादर केले. यंदाच्या मूळ अंदाजपत्रकात पंचायत विभागासाठी २० कोटी ७६ लाख ५०० रुपयांची तरतूद केली आहे. मुद्रांक शुल्क ग्रामपंचायतींना वाटप करण्यासाठी ७९ कोटी रुपयांची तरतूद आहे. कृषी विभागासाठी तीन कोटी ३२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. महिला व बालकल्याण विभागासाठी आठ कोटी ५० लाख रुपयांची पुरवणी निधीची तरतूद केली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव राहूल काळभोर, तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांची मुदत संपल्यानंतर अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेच्या निवडणुका न झाल्याने प्रशासकांनी अंदाजपत्रक सादर केले. या अंदाजपत्रकामध्ये केवळ संस्थात्मक कामांवर अधिक भर दिला आहे.

# प्रचारात धर्मावरुन समाजात दुही माजवण्याचा प्रयत्न

## फडणवीसांविरोधात तक्रार

।बारामती ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।



कसबा पोटनिवडणुकीत आचारसंहितेचं उल्लंघन केल्याप्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविरोधात निवडणूक आयोगाकडं तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रचारादरम्यान धर्माचा उल्लेख करत समाजात दुही माजवल्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. कसबा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी निवडणूक आयोगाकडं ही तक्रार दाखल केली आहे. या तक्रार पत्रात त्यांनी आरोप केला की, "नुकत्याच पार पडलेल्या कसबा विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आचारसंहितेचा भंग केला आहे.

२३ फेब्रुवारी रोजी कसब्यात केलेल्या भाषणात फडणवीसांनी हिंदुत्वाचा उल्लेख करत स्पष्टपणे मतदारांना भडकवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या भाषणातून निवडणूक प्रचारात धर्माचा वापर करून समाजात दुही माजवण्याचा प्रयत्न केल्याचे व त्याद्वारे निवडणूक आचारसंहितेचा भंग केल्याचं स्पष्टपणे दिसून येत आहे, असं या तक्रारीत धंगेकर यांनी म्हटलं आहे.

# पुणे कँटोन्मेंट बोर्डाचा निवडणूक कार्यक्रम घोषित

**कँटोन्मेंट** - पुणे छावणी ( कँटोन्मेंट) परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका नुकत्याच घोषित करण्यात आल्या. त्यानुसार दि. ३० एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीकरिता दि. २० व २१ मार्च रोजी सकाळी १०:३० वा. पासून ते दुपारी ४ वाजेपर्यंत निवडणूक अधिकाऱ्यांकडे उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. अशी माहिती बोर्डाचे अध्यक्ष आर.आर कामत यांनी परिपत्रकाद्वारे जारी केली आहे.

# कसबा तो झाकी है..."; पुण्यात आता फ्लेक्सची चर्चा

## » कवितेनंतर फ्लेक्सच्या माध्यमातून भाजपला डिवचलं

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कसब्यात आमदार मुक्ता टिळक तर चिंचवडमध्ये आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर पोटनिवडणूक लागली. ही निवडणूक भाजपसह व महाविकास आघाडीकडून कधी नव्हे इतकी प्रतिष्ठेची करण्यात आली. या दोन्ही ठिकाणी दोन्ही गटाचे दिग्गज नेतेमंडळींनी प्रचारात सहभाग घेतला होता. त्यामुळे येथील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.**

प्रचाराच्या रणधुमाळीत तापलेले वातावरण मतदानानंतरही शांत होण्याचे नाव घेताना दिसत नाही.

दरम्यान, कसब्यात आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी दोन्ही उमेदवारांवर गुन्हे दाखल करण्यात आले. भाजपने पैसे वाटल्याचे आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आले.

मारहाणीच्याही घटना कसब्यात घडल्या. त्यानंतर निकाल लागण्यापूर्वीच आमदार म्हणून भाजपचे हेमंत रासने आणि काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचे फ्लेक्सही लागले होते.

विविध कारणांनी कसब्याची पोटनिवडणूक राज्यात गाजली आहे. त्यामुळे येथील निकालाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. आता या निवडणुकीचा निकाल उद्या (ता. २) लागणार आहे.

### कवितेतून भाजपला उत्तर

»भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कसबा पोटनिवडणुकीचा प्रचारादरम्यान भरसभेत व्हू इज धंगेकर? असा प्रश्न विचारला होता. यातून त्यांनी महाविकास आघाडीला डिवचण्याचा प्रयत्न केला होता. त्या प्रश्नाचे उत्तर काँग्रेसने कवितेच्या माध्यमातून दिले आहे. कवितेचे शिर्षकही "व्हू ईज धंगेकर?" असेच आहे. प्रत्येक ओळीत प्रश्न आणि त्याचे थेट भाजपला उत्तर अशा स्वरूपाची ती कविता आहे. ती सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे

तत्पुर्वीच कसब्यात एक कविता व्हायरल करण्यात आली आहे. त्या कवितेच्या माध्यमातून काँग्रेसने भाजपला डिवचण्याचा प्रयत्न केला. या कवितेतून प्रचारादरम्यान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विचारलेल्या एका खोचक प्रश्नाचे मार्मिकपणे उत्तर देण्यात आले आहेत.



# उद्योगनगरीची ‘पाणीबाणी’!

## » चिखली भागात सर्वाधिक तक्रारी : महापालिका प्रशासनासमोर आव्हान



।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये पाण्याची समस्या गंभीर होऊ लागली आहे. शहराच्या विविध भागांतून कमी दाबाने आणि कमी वेळ पाणीपुरवठा होत असल्याबाबतच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. नागरिकांना तक्रार करण्यासाठी आणि या तक्रारी सोडविण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने तयार केलेल्या हेल्पलाईनवर दररोज १० ते १२ तक्रारी येत आहेत. सर्वाधिक तक्रारी चिखली भागातून येत असून या तक्रारी निकाली काढत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे मोठे आव्हान आहे.**

महापालिका पवना धरणातून दिवसाला ५१० एमएलडी आणि एमआयडीसीकडून ३० असे ५४० एमएलडी पाणी उचलते. शहरात २५ नोव्हेंबर २०१९ रोजी तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी शहरात दिवसाआड पाणी पुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला. सव्वा तीन वर्ष होत आले तरी दिवसाआडच पाणी पुरवठा सुरू आहे. महापालिका पवना धरणातून दिवसाला ५१० एमएलडी पाणी उचलते. हे पाणी पवना नदीतून रावेत बंधाऱ्यावरून प्राधिकरणातील सेक्टर २३ येथील जलशुध्दीकरण केंद्रात आणून शुध्द केले जाते. त्यानंतर शहरातील विविध भागात पाणी वितरित करण्यात येते.

शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने आंद्रा धरणातून १०० आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी शहराला मिळणार आहे. हे पाणी निघोजे येथील बंधाऱ्यातून उचलण्यात येणार आहे. त्या पाण्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केली जाईल. त्यानंतर भोसरीभागातील समाविष्ट गावांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. चिखलीतील जलशुध्दीकरण केंद्राचे कामही पूर्ण झाले आहे. मात्र, उद्‌घाटनासाठी नेत्यांची वेळ मिळाली नसल्याने शहरवासीयांना हक्काच्या १०० एमएलडी पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे.गेल्यावर्षी महापालिकेच्या प्रत्येक जनसंवाद सभेमध्ये पाण्याच्या तक्रारींचे प्रमाण जास्त होते. त्यासाठी प्रशासनाने पाणी पुरवठ्याच्या तक्रारीकरिता २४ मार्च २०२२ रोजी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली. या हेल्पलाईनचा ७७२२०६०९९९ क्रमांक जाहीर केला. ही हेल्पलाईन बंद न करता वर्षभर पाणी पुरवठा विभागाने सुरू ठेवली. यावर्षी हेल्पलाईन २४ तास सुरू राहणार आहे. हेल्पलाईनचे काम सकाळ, दुपार व रात्र असे तीन पाळ्यांमध्ये चालते. जानेवारी महिन्यांपर्यंत अपुऱ्या पाण्याची एकही तक्रार येत नव्हती. मात्र, फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून शहरातील अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ होऊ लागली आहे. कमी दाबाने आणि कमी वेळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. शहराच्या विविध भागातून अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या दररोज दहा ते बारा तक्रारी येऊ लागल्या आहेत. या तक्रारी पाणी पुरवठा विभागाकडे पाठिवल्या जातात. त्यानंतर संबंधित तक्रारींवर कार्यवाही केली जाते, असे पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.



> “ **चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी उचलण्याची चाचणी सुरू आहे. त्यामुळे २० ते ३० एमएलडी पाणी अधिकचे मिळत आहे. उर्वरित कामे पुढील आठ दिवसांत पूर्ण होतील. त्यानंतर १०० एमएलडी पाणी मिळेल आणि पाणी कमी दाबाने येण्याच्या तक्रारी कमी होतील.**
>
> **प्रदीप जांभळे-पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### ‘फ’ आणि ‘इ’ प्रभागातून सर्वाधिक तक्रारी

**»‘फ’ प्रभागातील चिखली गावठाण, जाधववाडी, तळवडे, रूपीनगर, त्रिवेणीनगर, निगडीगावठाण, नेवाळे, हरगुडे वस्ती, घरकुल, पूर्णानगर, संभाजीनगर परिसर आणि ‘इ’ प्रभागातील च-होली गावठाण, चोवीसावाडी, मोशी गावठाण, दिघी गावठाण परिसर, भोसरीतील गव्हाणे वस्ती, आळंदी, नाशिक रोड या भागातून सर्वाधिक तक्रारी येतात. ‘ड’ प्रभागातील वाकड, पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर, वाकड परिसरातूनही काही प्रमाणात तक्रारी येत आहेत. कमी दाबाने आणि अपुरा वेळ पाणीपुरवठा होत असल्याबाबतच्या तक्रारींचे प्रमाण अधिक आहे. सारथी हेल्पलाईनवर देखील काही तक्रारी येतात.**

### एमआयडीसीकडून होणारा पाणीपुरवठा आज बंद

**»महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) रावेत येथील पाणीपुरवठा केंद्रातील देखभाल दुरुस्तीची कामे आज (गुरुवारी) दिवसभर करण्यात येणार आहेत. त्यामुळे पिंपरी,चिचवड , भोसरी, देहूरोड, कासारवाडी, फुगेवाडी, निगडी, सीएमई, दिघी, व्हीएसएनएल, कॅन्टोन्मेंट बोर्ड, ओएफडीआर या भागातील आजचा पाणीपुरवठा बंद राहील. त्याचबरोबर शुक्रवारी पाण्याचा पुरवठा कमी दाबाने आणि अपुरा होण्याची शक्यता आहे. त्यासाठी नागरिकांनी पाण्याचा साठा करण्याची काळजी घ्यावी, असे आवाहन एमआयडीसीने केले आहे.**

## संपादकीय »

# काढावे की कुजवावे?

***भारत वास्तविक चीननंतर कांदा उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा देश. पण या देशात आणि विशेषकरून महाराष्ट्रात कांदा मातीमोल होण्यास निसर्गापेक्षा शासकीय विचारशून्यता अधिक कारणीभूत असावी असे दिसते. शेतकऱ्यांच्या कष्टाला निसर्गाची साथ मिळाली.***

भारत वास्तविक चीननंतर कांदा उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा देश. पण या देशात आणि विशेषकरून महाराष्ट्रात कांदा मातीमोल होण्यास निसर्गापेक्षा शासकीय विचारशून्यता अधिक कारणीभूत असावी असे दिसते. शेतकऱ्यांच्या कष्टाला निसर्गाची साथ मिळाली, हवामान अनुकूल होते म्हणून भरघोस कांदा उत्पादन झाले, ही शेतकऱ्यांची चूक ठरावी, असे विचित्र वातावरण देशात आहे. एकीकडे कृषिमालाची निर्यात वाढल्याचा डांगोरा पिटला जात असताना मातीमोल झालेल्या कांद्याचे, शेतकऱ्यांच्या घामाचे मूल्य काय, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सरकारकडे नाही. याचे कारण कांदा हे राजकीयदृष्ट्या संवेदनशील पीक नाही. ही गोष्ट गहू आणि तांदळाच्या बाबतीत घडते तेव्हा सरकार निमूटपणे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊनही माल खरेदी करण्याची योजना आखते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढे कांद्याने निर्माण केलेले प्रश्न त्यांच्या जीवनमरणाचे आहेत आणि सरकार त्याकडे ढुंकूनही पाहण्यास तयार नाही. उत्पादन खर्चापेक्षा कांद्याचे बाजारभाव कमी झाले आहेत. या कोसळलेल्या बाजारभावामुळे कांद्याच्या काढणीचा खर्चही परवडत नाही म्हणून अनेक शेतकऱ्यांनी कांद्याच्या पिकांत ट्रॅक्टर फिरवून कष्टाने पिकवलेला कांदा मातीत गाडून टाकला आहे. चारशे-पाचशे किलो कांदा विकून शेतकऱ्यांच्या हातात एक किंवा दोन रुपये पडत आहेत. हा कोणता न्याय आहे? शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल ते हेच का? या प्रश्नाने सरकारची झोप उडत नाही, हे आपल्या कृषीआधारित अर्थव्यवस्थेचे सर्वात मोठे दुर्दैव आहे. राज्य सरकारने-मग ते कोणत्याही पक्षाचे असो-कांद्याच्या पिकाबाबत दाखवलेल्या सततच्या असंवेदनशीलतेमुळे कांदा साठवणुकीची अपुरी व्यवस्था, त्यावरील प्रक्रिया उद्योगांकडे दुर्लक्ष आणि पीक उत्पादनाच्या क्षेत्राबाबतची नियोजनशून्यता ही कांद्यामागील संकटाची काही कारणे.

# वस्त्या उभ्या राहतायत... सुरक्षा, सुविधांची बोंब!






भारतीय जनता पक्षाला जवळून ओळखणारे अगदी संघाशी संबंध असला किंवा नसला तरी भाजपला आपला पक्ष समजणारे बहुतांश सामान्य हिंदू आज भाजपच्या या बदललेल्या रूपाला आणि मोदी-शहा यांच्या अहंकाराने पछाडलेल्या वृत्तीला पाहून आश्चर्यचकित होतात आणि भाजप जो त्यांना आवडत होता तो हाच का, असा प्रश्न त्यांना पडतो आहे. मोदी यांच्यावर अदानीप्रकरणी संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशी का नाही, म्हणत टीका करणारे काँग्रेसचे पवन खेरा यांना थेट विमानतळावरून उचलून अटक केली जाते, अमित शहा महाराष्ट्रात येऊन उद्धव ठाकरे यांना धडा शिकवणार वगैरे उन्मत्त उद्गार काढतात, 'उद्धव ठाकरे तळवे चाटत होते' असे विधान करतात , ज्या उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कालावधीत त्यांनी केलेल्या कार्याचा जागतिक दखल घेऊन गौरव केला जातो, सर्वोच्च न्यायालयापासून ते आंतरराष्ट्रीय संशोधकांपर्यंत सगळे उद्धव ठाकरे यांना उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून काम केल्याची शाबासकी देतात त्यांच्या बद्दल केवळ सत्तेच्या आणि पदाच्या जोरावर अमित शहा वाट्टेल ते बोलून जातात आणि आपल्या महाराष्ट्रात आपल्या मराठी माणसांसमोर झालेल्या या उन्मत्त उद्गारांबाबत आपण कोणीच काही बोलत नाही. सत्ता माणसांना लाचारी स्वीकारायला लावते ती कशी त्याचे हे उदाहरण म्हणावे लागेल.

आपण ज्या भाजपवर एकेकाळी आदर्श पक्ष म्हणून प्रेम केले, ज्या अटलजी-अडवाणी यांना देशातील आदर्श नेते म्हणून अभिमानाने गौरविले त्यांच्या भाजपमध्ये आज हे सुरू आहे. ईडी, सीबीआय, आयटी, पोलीस या यंत्रणांना वापरून विरोधकांची मुस्कटदाबी करण्याचा हा प्रकार देशातील जनता मूकदर्शक म्हणून बघत बसली आहे. महाराष्ट्राने ज्या प्रमोद महाजन – गोपीनाथ मुंडे – नितीन गडकरी या भाजपमधील त्रिकुटावर अतोनात प्रेम केले, त्या भाजपमध्ये आज हे असले कार्यकर्ते आहेत जे तोंडातून ब्र काढायला तयार नाहीत. भाजपचे हे त्रिकूट आज भाजपमधील नेत्यांच्याच विस्मरणात गेले आहे. भाजपची ही अवस्था घसरणीकडेच जाणारी आहे.भाजपचा इतिहासच ज्याची गरज त्याला प्राधान्य असा राहिला आहे. भाजपसोबत जे जे गेले त्यांना संपवण्याचा कार्यक्रम भाजपने राबवला, गरज सरो वैद्य मारो – अगदी मेला नाही तर मारा, परत त्याने डोके वर काढूच नये, स्वार्थासाठी वापरा आणि त्याचे काम संपले की फेकून द्या, हेच या नव्या भाजपचे राजकारण असल्याचे, ताज्या इतिहासात डोकावले की सहज जाणवेल. आजपर्यंत भाजपसोबत युती केलेले पक्ष पाहा आणि आठवा ते सध्या कुठे आहेत. म.गो. पक्ष युती, मेहबूबा मुफ्ती यांच्याशी युती, मायावतींच्या पक्षाशी युती, ममता बॅनर्जींशी युती, नितीशकुमार यांच्याशी युती, हरियाणात बिश्नोई यांच्याशी युती, कर्नाटकात एच. डी. कुमारस्वामी यांची फसवणूक करणारी युती, पासवान यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाची फसवणूक, खासदार चिंतामण वनगा, खासदार मनोहर पींकर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या परिवाराची वाताहत करणारी भाजपच होती, मग बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर ते उद्धव ठाकरेंना कसे सोडतील.. मात्र उद्धव ठाकरे यांनी त्यांचा डाव ओळखला आणि धोबीपछाड दिला, म्हणून त्यांच्याच शिलेदारांना फोडून उन्मत्तपणे 'आम्ही बदला घेतला' अशी विधाने करणारी ही भाजप!

### शिवसेना संपवूनच महाराष्ट्र हवा

बाळासाहेब असेपर्यंत अतिशय गोड वागणारे भाजपचे नेते बाळासाहेब कैलासवासी झाल्यावर मात्र एकदम पलटले, शिवसेना संपवा आणि महाराष्ट्र काबीज करा या हेतूने झपाटले आणि त्यातूनच पुढील कारवाया झाल्या.

**एकेकाळी गावात एक-दोघांकडे सायकल असणे, नंतर गावात प्रत्येक घरात सायकल असणे आणि हळूहळू लोकांच्या नियमित वापरातून सायकल जाऊन मोटरसायकल येणे ही स्थित्यंतरे आहेत. अलीकडच्या काळात सायकल पुन्हा चर्चेत आली आहे.**

# गोष्ट सायकलची



सायकलीवरून सकाळी व्यायाम करणारे अनेक जण आपापले अनुभव सांगत असतात. आता भारी किमतीच्या सायकलीसुद्धा आल्या आहेत. या सगळ्या सायकलीच्या गोष्टी ऐकून माझ्या आठवणीतील सायकल आठवली.

आमचे गाव तसे दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्यावर; पण हा जुना जिल्हा मार्ग. अगदी अलीकडच्या काळातही सांगलीहून साताऱ्याला या रोडने कोणी जात नाही. गेल्या तीस वर्षांपूर्वीही हा रस्ता तसा कमी वाहतुकीचाच.

आडवळणी असा. सकाळी साडेसहा वाजता येणाऱ्या पहिल्या गाडीने गावातून वाहतूक सुरू व्हायची. नंतर दिवसभर तास-दीड तासाने एसटी बस यायची. शेवटची गाडी रात्री आठ वाजता आली की पुन्हा हमखास सांगता येईल, असे कोणतेही वाहन गावाकडे यायचे नाही. ही परिस्थिती आम्ही महाविद्यालयात होतो तोवरची.अशा गावात त्या काळात पर्यायी वाहतुकीचे साधन म्हणून सायकल आली. गावात आलेली पहिली सायकल बघायला लोक रस्त्यावर गर्दी करत असत. भारतभर प्रसिद्ध पावलेले आमच्या गावचे वयोवृद्ध सायकलस्वार गणपती बाळा यादव हे याबाबतची आठवण नेहमी सांगत.

गावात सायकलीसुद्धा फार कमी होत्या. अगदी संपूर्ण गावात मिळून दहा-बारा. ज्यांच्याकडे सायकली होत्या त्यांचा एक वेगळा रुबाब होता. गावात काही दुर्घटना घडली तर त्यांच्या सायकलीवरून जाऊन ती बातमी आसपासच्या खेड्यात पोहोचवली जाई.लग्न पत्रिका पोहोचवायलासुद्धा सायकलस्वार लोक मदतीला येत असत. कोणी आजारी पडले तर शेजारच्या गावाला जाऊन डॉक्टरांना सांगावा देण्याचे कामही तेच लोक करत. या सगळ्या आम्ही ऐकलेल्या गोष्टी.

मी दहावीत असेपर्यंत सायकल असणे ही गोष्ट अगदी सांगण्याची गोष्ट होती. नंतर पुढे या सायकलीचा एक छंद लागला. आसपासच्या कुंडल, देवराष्ट्र, विटा पलूस गावांना जाणे व्हायचे. एसटीची वाट पाहात बसण्यापेक्षा सायकलीवरून जाणे सोयीचे वाटायचे.थोडा उशीर झाला तर मग वाटेत पाहुण्यांच्या घरी जाऊन मुक्काम करण्यात आनंद होता. आजच्यासारखे अगोदर सांगून पाहुण्यांकडे जायची पद्धत नव्हती. अचानक दारात आलेला पाहुणा पाहून त्यांनाही आनंद व्हायचा. सकाळी लवकर उठून चहा घेतला, की पुन्हा गावाच्या दिशेने प्रवास सुरू.आम्ही फारफार तर जिल्ह्यापर्यंत सायकलीने प्रवास केला; पण आमच्या पिढीच्या आधीचे लोक अगदी कोल्हापूर-साताऱ्यापर्यंत प्रवास करत. काही कार्यक्रम असतील, कुस्त्या असतील तर गावातील सात-आठ लोक आपापल्या सायकली घेऊन बाहेर पडत.

दोन-तीन दिवसांनी परत येऊन गावातील लोकांना त्यांनी पाहिलेली गावे, बघितलेली माणसे, वेगळे अनुभव सांगत. गावातील लोकांपर्यंत बाहेरची माहिती अशी पोहोचत असे. आमच्या गावातील काही लोक दरवर्षी पंढरपूरला सायकलवरून जात असत.

सकाळी लवकर गावातून बाहेर पडत, रात्री उशिरा पंढरपूरला पोहोचत. पाच-सहा दिवस थांबून पुन्हा गावाकडे येत. गावातील अशी मोजकी माणसे सायकलवाली होती, नंतर गावात घरोघरी सायकली आल्या. सायकल हे सर्वांना परवडेल असे वाहन झाले. त्याच काळात माझ्याकडे सायकल आली.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# काँग्रेस-राष्ट्रवादीने सोडली ठाकरे गटाची साथ?

## संजय राऊत यांच्या हक्कभंगाच्या कारवाईवरुन महाविकासआघाडीत मतभेद

। मुंबई । महाईन्यूज ।

**कारचे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन चांगलेच गाजत आहे. विरोधक आक्रमक झाले असले तरी ठाकरे गट एकाकी पडल्याचे चित्र दिसत आहे. संजय राऊत (SANJAY RAUT) वक्तव्य प्रकरणात काँग्रेस ,राष्ट्रवादीने (NCP) ठाकरे गटाची साथ सोडल्याचे चित्र पहायला मिळाले. संजय राऊत यांच्या हक्कभंगाच्या कारवाईवरुन महाविकासआघाडीत मतभेद पहायला मिळाले.**

विधिमंडळ हे चोरमंडळ आहे असं धक्कादायक विधान खासदार संजय राऊत यांनी कोल्हापुरात



केले. संसदेतील गटनेतेपद काढलं तरी हरकत नाही, शिंदे गट चोरमंडळ, विधिमंडळ हे चोरमंडळ आहे असं ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर जोरदार गदारोळ झाल्यावर राऊत यांनी यू टर्न घेतला.

**संजय राऊतांच्या वक्तव्यावरून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात तीव्र नाराजी**

### संजय राऊतांना तातडीनं अटक करा - शिंदे गट

**» संजय राऊतांच्या वक्तव्यावरुन शिंदे गट चांगलाच आक्रमक झालेला पहायला मिळाला. संजय राऊतांना तातडीनं अटक करा अशी मागणी शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावलेंनी केली. चोर आम्ही की संजय राऊत असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. राऊतांच्या वक्तव्यावरुन गोंधळ झाल्यानंतर दोन्ही सभागृह दिवसभरासाठी तहकूब झाली. त्यानंतर शिंदे गटातील आमदारांनी विधिमंडळाच्या पाय-यांवर आंदोलन केले.**

संजय राऊतांच्या वक्तव्यावरून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातून तीव्र नाराजी व्यक्त झाली.ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेही याच विधीमंडळाचे सदस्य आहेत याची आठवण उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी करून दिली. तर, अजित पवारांनीही शाहनिशा करून कारवाई करावी असं म्हटलंय. काँग्रेसनेही राऊतांच्या विधानावर असहमती दर्शवली.

**संजय राऊतांच्या वक्तव्याप्रकरणी काँग्रेस, राष्ट्रवादी अलिप्त का?**

### राऊत यांना वादग्रस्त वक्तव्य भोवण्याची शक्यता

**» ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना वादग्रस्त वक्तव्य भोवण्याची शक्यता आहे. राऊत यांच्याविरोधात भाजपचे आमदार अतुल भातखळकरांनी हक्कभंग सूचना मांडली. सभागृहाची भावना ऐकून अध्यक्षांनी हक्कभंगावर 2 दिवसांत सखोल चौकशी करून 8 मार्चला निर्णय देणार असल्याचं म्हटलंय. तर, अटकेचा निर्णय उपमुख्यमंत्री घेतील असं विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी म्हटले.**

संजय राऊतांच्या वक्तव्याप्रकरणी काँग्रेस, राष्ट्रवादी अलिप्त का असा प्रश्न निर्माण होत आहे. कारण, एकीकडे संजय राऊत यांच्यावर कारवाईसाठी सत्ताधारी सभागृहात आक्रमक झाले होते. तर, दुसरीकडे मविआचे घटक पक्ष असलेले काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मात्र शांतच बसले होते. उलट अजित पवार आणि नाना पटोलेंनी राऊतांच्या हक्कभंगाचं समर्थनच केलं. त्यामुळेही ठाकरे गटाच्या आमदारांमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे. दरम्यान, संजय राऊत यांचे बंधू आमदार सुनील राऊतांनी यांनी ठाकरे गट एकाकी पड्ल्याचं फेटाळून लावले आहे.

---

# "...मग उद्धव ठाकरेही चोरमंडळाचे सदस्य ठरतील"

## विधिमंडळाबाबत केलेल्या विधानानंतर फडणवीसांचं संजय राऊतांवर टीकास्त्र!

। मुंबई । महाईन्यूज ।

**संजय राऊतांनी आज पत्रकारांशी बोलताना विधिमंडळाचा उल्लेख चोरमंडळ असा केला होता. राऊतांच्या या विधानानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. यावरून विविध राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राऊतांच्या विधानाचा निषेध केला आहे. विधानपरिषदेत बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.**

"विधिमंडळाला चोर म्हणणं हे सहन करण्यासारखं नाही. या विधानमंडळाला मोठी परंपरा आहे. अनेक मोठे नेते या सभागृहाने बघितले आहेत. आपल्या राज्याचं विधानमंडळ हे देशातील सर्वोत्कृष्ट असं विधानमंडळ आहे. या विधानमंडळाला चोर म्हणण्याचा अधिकार कोणाला दिला, तर जनतेचा या सभागृहावर विश्वास राहणार नाही. त्यामुळे राऊतांच्या विधानाचं समर्थन करता येणार



### "...मग उद्धव ठाकरे देखील चोरमंडळाचे सदस्य ठरतात"

**» "हा विषय एका पक्षापुरता मर्यादित नाही. विधिमंडळ म्हटल्यानंतर उद्धव ठाकरे सुद्धा सभागृहाचे सदस्य आहे. मग तेही चोरमंडळाचे सदस्य ठरतात. आम्ही सर्वचचोर मंडळाचे सदस्य ठरतो. राऊतांनी केवळ चोरमंडळ नाही, तर गुंडमंडळ असा शब्दही वापरला आहे. आम्ही काय गुंड आहोत का?" असा प्रश्नही फडणवीसांनी विचारला.**

नाही", अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**"राऊतांच्या विधानाचा निषेध करावाच लागेल, अन्यथा..."**

"संजय राऊत हे साधे नेते नाहीत. ते राज्यसभेचे सदस्य आहेत. अशा मोठ्या सभागृहाचे सदस्य जर अशा प्रकारे बोलत असतील, तर आपण कसं सहन करायचं? त्यामुळे त्यांच्या या विधानाचा निषेध केला नाही, उद्या १०० राऊत तयार होऊन या विधानमंडळाला रोज चोर म्हणतील", असेही ते म्हणाले.

# शेतकऱ्यांना मदतीची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

## विधिमंडळात गदारोळ; कांदा भाव घसरणीच्या अभ्यासासाठी समिती

। मुंबई । महाईन्यूज ।

**कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांचे होत असलेल्या नुकसानीचे पडसाद विधिमंडळाच्या उभय सभागृहांमध्ये मंगळवारी उमटले. राज्य सरकारने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना मदत करावी तसेच कांदा निर्यातीला परवानगी द्यावी आणि 'नाफेड'मार्फत खरेदी करण्यात यावी, अशा मागण्या करीत विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. त्यावर सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी असून आवश्यकतेनुसार मदतही जाहीर करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली.**



या प्रश्नावर विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला असतानाच, राज्य सरकारनेही त्याची दखल घेत कांदा भाव घसरणीची कारणे शोधण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी गेल्या काही दिवसांपासून ठिकठिकाणी आंदोलन करीत बाजारपेठा बंद पाडल्या आहेत. महाविकास आघाडीच्या सदस्यांनी कांदा आणि कापसाच्या माळा घालून विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. कांदा उत्पादक आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सरकारकडून न्याय मिळत नसल्याचा आरोप करीत विरोधकांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर विधानसभेतही विरोधकांनी कांद्याचा मुद्दा उपस्थित करीत कामकाज रोखण्याचा प्रयत्न केला. राज्यातील कांदा, कापूस, सोयाबीन, हरभरा, द्राक्ष उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. त्यांचा शेतमाल कवडीमोल दराने विकला जात आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर तातडीने चर्चा करावी अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. कांदा प्रश्नावर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून 'नाफेड'सारख्या संस्थांना कांदा खरेदी करण्याच्या सूचना द्याव्यात तसेच केंद्र सरकारशी समन्वय साधून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणीही पवार यांनी केली. केंद्र सरकारच्या धरसोडीच्या भूमिकेमुळे परदेशातील व्यापारी कांदा खरेदी करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे केंद्र सरकारने कांदा निर्यातीस परवानगी द्यावी अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली. विरोधकांच्या भूमिकेशी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनीही सहमती दर्शवीत या प्रश्नात सरकारने हस्तक्षेप करण्याची मागणी केली.शेतकऱ्यांच्या पाठीशी कांदा उत्पादकांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे असून 'नाफेड'कडून कांदा खरेदी सुरू झाली आहे. तसेच शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार मदत करण्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. 'नाफेड'ला अतिरिक्त कांदा खरेदी करण्याची विनंती करण्यात आली असून खरेदी केंद्रे सुरू झाली आहेत. २.३८ लाख मेट्रिक टन कांदा आतापर्यंत खरेदी झाला आहे. बंद असलेली खरेदी केंद्रे सुरू केली जातील. तसेच कांदा निर्यातीवर बंदी नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रीसमध्ये मृत्यूतांडव!

## भरधाव रेल्वेंची समोरासमोर धडक; 32 जणांचा मृत्यू, 85 जखमी

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**उत्तर ग्रीसमध्ये रेल्वे अपघाताची एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. शेकडो लोकांना घेऊन जाणाऱ्या एक प्रवासी रेल्वेने समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या मालवाहू रेल्वेला धडक दिली आहे. या अपघातानंतर रेल्वेचे अनेक डबे लोहमार्गावरून घसरले आहेत. तर अनेक प्रवासी खिडकीमधून बाहेर फेकले आहेत. या दुर्दैवी अपघातात ३२ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर ८५ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. या अपघातानंतर रेल्वेचे काही डबे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. याबाबतची माहिती स्थानिक अधिकाऱ्याने दिली.**

मंगळवारी मध्यरात्री उत्तर ग्रीसमधील टेम्पे शहराजवळ हा अपघात झाला. दोन रेल्वेची समोरासमोर धडक झाल्याने अनेक डबे रुळावरून घसरले तर किमान तीन डब्यांना आग लागली. अपघाताची माहिती मिळताच बचाव दलाच्या कर्मचाऱ्यांनी बुधवारी पहाटे घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना बाहेर काढण्याचं काम केलं.ग्रीक अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली आहे.

सध्याच्या घडीला १७ अग्निशमन दलाच्या गाड्या आणि ४० रुग्णवाहिका आणि किमान १५० अग्निशमन दलाचे जवान बचाव कार्य करत आहेत, अशी माहिती ग्रीक अग्निशमन दलाचे प्रवक्ते वॅसिलिस वार्थकोगियानिस यांनी दिली.



## घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतीमध्ये वाढ

### सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

१ मार्च २०२३ पासून देशभरामध्ये काही नवे नियम लागू करण्यात आले आहेत. यानुसार एलपीजी सिलेंडर्सच्या दरामध्येही वाढ करण्यात आली आहे. सरकारद्वारे घेतल्या गेलेल्या या निर्णयामुळे सामान्य नागरिकांचे मासिक आर्थिक नियोजन बिघडणार आहे. आजपासून एलपीजी सिलेंडर्ससह अन्य अनेक गोष्टींच्या किमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

घरगुती वापरासाठी असलेल्या गॅस सिलेंडरच्या किंमतीमध्ये ५० रुपयांनी वाढ करण्यात आले आहेत. यानुसार दिल्लीमध्ये १४.२ किलोग्रॅम सिलेंडरची किंमत ११०३ रुपये झाली आहे. कमर्शियल एलपीजी सिलेंडर्सच्या किंमतीमध्ये ३५०.५० रुपयांनी वाढ झाल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी या गॅस सिलेंडर्सची किंमत २,११९.५० रुपये झाली आहे.२०२२ मध्ये काही महिन्यांपूर्वी घरगुती वापरातील गॅस



सिलेंडरच्या दरात १५० रुपयांनी केली गेली होती. तेव्हा व्यावसायिक वापरातील एलपीजी सिलेंडर्सची किंमत २५ रुपयांनी वाढवण्यात आली होती. ६ जुलै २०२२ पासून एलपीजी सिलेंडर्सच्या दरामध्ये बदस करण्यात आला नव्हता. होळीपूर्वी या दरांमध्ये वाढ होण्याची शंका व्यक्त केली जात होती.

स्थानिक करांवरुन घरगुती गॅस सिलेंडर्सच्या किंमती अवंलबून असतात. राज्यानुसार त्यांच्या किंमतींमध्ये बदल पाहायला मिळतात. तेल विपणन कंपन्या दर महिन्याच्या सुरुवातीला गॅस सिलेंडरच्या दरांबाबत माहिती प्रसिद्ध करत असतात. आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किंमतींचा परिणाम देशांतर्गत गॅस सिलेंडर्सच्या किंमतींवर होत असतो.

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर!

### सातव्या केंद्रीय वेतन आयोगाअंतर्गत वाढणार पगार

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना सातव्या केंद्रीय वेतन आयोगाअंतर्गत पगार वाढ, महागाई भत्ता (DA) आणि महागाई सवलत (DR) मिळण्याची शक्यता आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी फिटमेंट फॅक्टरचा वापर केला जातो. मार्च २०२३ मध्ये यामध्ये सुधारणा केल्याने होळीनंतर सरकारद्वारे या संबंधित अधिकृत घोषणा होऊ शकते असे म्हटले जात आहे. ८ मार्च पर्यंत महागाई भत्ता आणि फिटमेंट फॅक्टरमझ्ये सुधारणा करण्याचा सरकारचा मानस आहे.**

सध्या कॉमन फिटमेंट फॅक्टर २.५७ टक्के इतका आहे. उदाहरणासह सांगायचे झाल्यास सहाव्या केंद्रीय वेतन आयोगानुसार, एखाद्या व्यक्तीला ४२०० ग्रेड पेमध्ये १५,५०० रुपये मिळतात. त्याला (रु. १५,५०० X २.५७) एकूण ३९,८३५ रुपये पगार मिळेल. त्याआधी ही टक्केवारी १.८६% इतकी होती. फिटमेंट फॅक्टरच्या गणितावरुन कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते. केंद्र सरकारसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी फिटमेंट फॅक्टरची टक्केवारी वाढवण्याची मागणी केली आहे. फिटमेंट फॅक्टरमध्ये २.५७ टक्क्यांऐवजी ३.६८ टक्क्यांचा वापर केला जावा असे त्यांनी म्हटले आहे. ही मागणी मान्य झाल्यास १८,००० रुपयांचे वेतन वाढून २६,००० रुपये इतके होईल.सरकारद्वारे मार्च महिन्यात महागाई भत्ता ८ टक्क्यांवरुन ४२ टक्क्यांपर्यंत वाढवेल असे संकेत आहेत. पगार वाढ आणि महागाई भत्ता या संबंधित बदल वर्षाच्या सुरुवातीला लागू करण्यात आले आहेत. तसेच पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता व महागाई सवलत यांमध्ये वाढ होऊ शकते असेही म्हटले जात आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना १८ महिन्यांचा महागाई भत्त्यांची थकबाकी देखील या महिन्यामधील दिली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



### फिटमेंट फॅक्टरच्या आधारे पेमेंट

**फिटमेंट फॅक्टरच्या गणितावरुन कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते. केंद्र सरकारसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी फिटमेंट फॅक्टरची टक्केवारी वाढवण्याची मागणी केली आहे. फिटमेंट फॅक्टरमध्ये २.५७ टक्क्यांऐवजी ३.६८ टक्क्यांचा वापर केला जावा असे त्यांनी म्हटले आहे. ही मागणी मान्य झाल्यास १८,००० रुपयांचे वेतन वाढून २६,००० रुपये इतके होईल.सरकारद्वारे मार्च महिन्यात महागाई भत्ता ८ टक्क्यांवरुन ४२ टक्क्यांपर्यंत वाढवेल असे संकेत आहेत. पगार वाढ आणि महागाई भत्ता या संबंधित बदल वर्षाच्या सुरुवातीला लागू करण्यात आले आहेत.**

# हृता दुर्गुळेची प्रेक्षकांना खुली ऑफर!

मालिका, नाटक, चित्रपट अशा तिहेरी माध्यमात अभिनयाची जादू दाखवलेली आणि तरुणांची विशेष लाडकी असलेल्या हृताने आजपर्यंत अनेक दर्जेदार मालिका केल्या आहेत. 'दूर्वा' या मालिकेतून तिने मनोरंजन विश्वात पदार्पण केलं. त्यानंतर तरुणांच्या पसंतीस उतरलेल्या फुलपाखरू मालिकेतून ती पुन्हा प्रेक्षकांसमोर आली. हि मालिका इतकी गाजली कि बघता बघता हृताचा चाहतावर्ग मोठ्या संख्येने वाढला. त्यानंतर तिने झी मराठी वरील 'मन उडू उडू झालं' हि मालिका केली. दरम्यान हृताने 'टाइमपास ३' आणि 'अनन्या' असे दोन चित्रपट केले. जय चित्रपटांनी तिला मोठी प्रसिद्धी दिली. अभिनेत्री हृता दुर्गुळे म्हणजे मनोरंजन विश्वातील एक चर्चेत असलेलं नाव. हृताचा चाहता वर्ग प्रचंड मोठा आहे. तिच्या प्रत्येक कलाकृतीला तिचे चाहते अक्षरशः डोक्यावर घेतात. त्याच चाहत्यांसाठी हृताने भन्नाट ऑफर दिली आहे. हृताचा लवकरच एक नवीन चित्रपट येत आहे. साधारणपणे आपल्याकडे चित्रपटाचं नाव, रिलीज डेट हे कलाकारांकडून एखाद्या मोठ्या सोहळ्यात किंवा सोशल मीडियावर जाहीर केलं जातं. पण हृताच्या या चित्रपटाची तशी कोणतीही अपडेट मिळाली नाही. त्याचे कारणही तसेच खास आहे. त्या चित्रपताबाबत जाणून घेण्यासाठी हृताने आपल्या चाहत्यांना थेट ऑफर दिली आहे. एक पोस्ट करत तिने ही ऑफर दिली आहे, जाणून घेऊया काय आहे की ऑफर..



या पोस्टमध्ये हृता म्हणते, "हाय फ्रेंड्स.. माझा एक नवा मराठी सिनेमा लवकरच येतोय, आणि त्यासंदर्भात तुम्हा सगळ्यांना एक धमाल सरप्राइज द्यायचंय!" "त्या सिनेमाचं नाव, रिलीज डेट तुम्हाला एकदम पर्सनल मध्ये सांगायचं..! माझ्या या नव्या फिल्मची ANNOUNCEMENT मी नाही तर मायबाप प्रेक्षकांनी म्हणजे तुम्ही करावी अशी यांच्या संपूर्ण टीमची इच्छा आहे."

# बसंतीचं अजब गणित

बॉलीवूडमध्ये गेल्या चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयानं चाहत्यांचे मनोरंजन करणाऱ्या ड्रीम गर्ल हेमा मालिनी यांची गोष्टच वेगळी आहे. आपल्या सौंदर्यानं, अभिनयानं हेमाजींनी लाखो चाहत्यांना आपलेसे केले आहे. हेमाजींचा एक व्हिडिओ सध्या नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसतो आहे. खासदार असणाऱ्या हेमा मालिनी यांनी मतदार संघातील जे प्रलंबित प्रश्न होते त्यावर भाष्य केले आहे. काही दिवसांपासून त्यांच्या मतदार संघातील प्रश्न घेऊन मतदारांनी त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांनी तो प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. प्रलंबित प्रश्नाचे कामकाज झाल्यानंतर त्याविषयी त्यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. हेमा मलिनी यांनी आपण १४ नाल्यांचे काम केले, त्यातील २० नाल्यांचे काम पूर्ण झाले आणि ४ नाल्यांचे राहिले आहे. असे



# वेशभूषा कुठलीही असो रुपाली गळ्यातील 'ती' चेन कधीच काढत नाही

'आई कुठे काय करते' मालिकेत संजना ही भूमिका साकारणारी अभिनेत्री रुपाली भोसले आता महाराष्ट्रातील घराघरात ओळखला जाणारा चेहरा आहे. मालिकेत तिची भूमिका सुरवातीला खलनायकी स्वभावाची असल्यामुळे अनेकांना तिचा राग यायचा.

पण मालिकेतील हीच संजना आता अरुंधतीच्या बाजूनं आणि अनिरुद्धच्या विरोधात उभी राहिलेली दिसल्यानं अनेकांना ती आवडू लागलीय. असो,मालिकेतील अभिनयाचा भाग सोडला तर संजना उर्फ रुपालीचं ड्रेसिंग स्टाईलही लोकांना आवडतं.

पण यात एक गोष्ट प्रामुख्यानं समोर आली ती म्हणजे कोणताही ड्रेस रुपालीनं परिधान केलेला असला तरी तिच्या गळ्यात एक चैन कायम पहायला मिळते. ढिगभर दागिने घातल्यावरही रुपाली ती काढत नाही आणि ज्या ड्रेसवर गळा रिकामा ठेवायची गरज असते तिथेही हट्टानं रुपाली ही चैन गळ्यात घालते.

आता जाऊन रुपालीनं स्टार प्रवाहच्या पुरस्कारसोहळ्या दरम्यान आपल्या या चेनीमागचं रहस्य प्रसारमाध्यमांसमोर ठेवलंनुकताच स्टार प्रवाह वाहिनीचा 'स्टार प्रवाह पुरस्कार सोहळा २०२३' मोठ्या दणक्यात पार पडला. लवकरच याचं प्रक्षेपण टी.व्हीवर केलं जाईल, यावेळी पुरस्कार सोहळ्यासाठी कॉश्च्युम थीम होती ट्रेडिशनल विथ ट्वीस्ट. यावेळी अनेक कलाकारांनी परिधान केलेल्या वेगवेगळ्या ड्रेसेसनी लक्ष वेधून घेतले. 'आई कुठे काय करते' फेम रुपाली भोसलेनंही सुंदर ड्रेस घातला होता पण तिच्या गळ्यात नेहमीची इव्हील आय असणारी चेन होती. यामागचं रहस्य तिला विचारताच ती म्हणाली, 'मी ही चेन कायम गळ्यात घालते'.

"जसं संजना मालिकेत अनिरुद्धशी कितीही भांडण करत असली..त्याच्याशी घटस्फोट घेण्याच्या उंबरठ्यावर असली तरी ती गळ्यातलं मंगळसूत्र काढत नाही. तसंच या चेनीशी माझे खास बंध आहेत. मग अगदी कोणतीही वेशभूषा असू दे मी ही चैन काढत नाही".

"अनेकदा एखाद्या ब्रॅन्डच्या शूटसाठी मला गळ्यातली चेन काढायला सांगतात तेव्हा माझा त्याला स्पष्ट नकार असतो".



# अब्बु मान गये! जान्हवीचं ठरलं, बॉयफ्रेंडसोबत गेली हनीमूनला?

अभिनेत्री जान्हवी कपूर ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळं चर्चेत आहे. ती शिखर पहाडियाला डेट करत असल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. त्यातच अलीकडे ती वडील बोनी कपूर आणि बहीण खुशी कपूरसोबत मुंबई विमानतळावर दिसली. मात्र तेथे तिच्या फॅमिली व्यतिरिक्त शिखरला पाहिल्यानंतर आता वेगळीच चर्चा सुरु आहे.शिखर पहाडिया हाच आहे ज्याच्यासोबत जान्हवी कपूरच्या डेटिंगच्या बातम्या सध्या येत आहेत. काही वर्षांपूर्वी जान्हवी आणि शिखर पहारिया यांच्याबद्दल बरीच चर्चा झाली होती.पापाराझीने इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर केला. यामध्ये खुशी आणि जान्हवी कपूर एअरपोर्टवर आत जाताना दिसत आहेत. काही मिनिटांनी आधी बोनी कपूर आणि नंतर शिखर पहारिया जातांना दिसत आहे.यावेळी जान्हवीनेही हसत हसत पापाराझींना पोज दिली आहे. जान्हवी कपूर आणि शिखर पहाडिया यांनी अजूनही त्यांच्या नात्याची पुष्टी केलेली नाही. पण दोघेही अनेकदा एकमेकांच्या सोशल मीडिया पोस्टवर कमेंट करतात तर कधी सोबत दिसतात.

अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्रच्या घर बॉम्बनं उडवण्याची धमकी! एका फोन कॉल अन् मुंबई पोलिसांचं धाबंच दणाणलं

दरम्यान जान्हवी तिचा वाढदिवस शिखरसोबत साजरा करणार असल्याचं बोललं जात आहे. जान्हवीचा वाढदिवस ६ मार्चला आहे आणि त्याआधी संपूर्ण कुटुंब आणि शिखर पहारिया सुट्टीसाठी निघाले आहेत.



# ख्वाजाचे शानदार अर्धशतक!

## इंदोर कसोटीत पहिल्या दिवसअखेर ऑस्ट्रेलिया मजबूत स्थितीत

।वेलिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आजपासून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरा कसोटी सामना सुरू झाला आहे. इंदोरच्या होळकर स्टेडियमवर हा सामना खेळला जात आहे. टीम इंडियाने चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत आधीच २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. ही कसोटी जिंकून भारतीय संघाला मालिका जिंकायची आहे. तसेच, हा सामना जिंकल्यानंतर टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल.**



भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडिया पहिल्या डावात १०९ धावांवर बाद झाली. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत चार गड्यांच्या मोबदल्यात १५६ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात कांगारू संघाने आतापर्यंत ४७ धावांची आघाडी घेतली आहे.पहिल्या डावात भारताने १०९ धावा केल्या त्यानंतर ऑस्ट्रेलियाची सुरुवात देखील खराब झाली. १२ धावांवर ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का बसला. डावाच्या दुसऱ्याच षटकात रवींद्र जडेजाने ट्रॅव्हिस हेडला (एलबीडब्ल्यू) पायचीत बाद केले. हेडला ६ चेंडूंत ९ धावा करता आल्या. त्यानंतर मार्नस लाबुशेनला आज दोनवेळा जीवदान मिळाले. रवींद्र जडेजाच्या चेंडूवर तो त्रिफळाचीत झाला होता मात्र तो नो बॉल निघाला त्यानंतर अश्विनच्या गोलंदाजीवर तो पायचीत होता मात्र रोहितने डीआरएस घेतला नाही त्यावेळी देखील तो बाद होता. शेवटी जडेजानेच त्याला ३१ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर उस्मान ख्वाजा शानदार अर्धशतक झळकावत ६० धावा केल्या. कर्णधार स्टीव्ह स्मिथ २६ धावा करून जडेजाचा शिकार झाला. सध्या पीटर हंड्स्कॉम्ब ७ तर कॅमरून ग्रीन ६ धावांवर खेळत आहेत. भारताकडून जडेजाने ४ विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी, भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रोहित आणि गिल जोडीने पहिल्या विकेटसाठी २७ धावांची भागीदारी केली. मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात कर्णधार रोहित १२ धावांवर यष्टिचित झाला. यानंतर विकेट्सची झुंबड उडाली. गिल २१, पुजारा एक आणि कोहली २२ धावा करून बाद झाला. श्रेयसला खातेही उघडता आले नाही. भरतच्या १७ आणि अक्षरच्या १२ धावांनी भारताची स्थिती थोडी सुधारली. अश्विन तीन धावा करून बाद झाला आणि उमेशने १७ धावांची खेळी खेळून भारताची धावसंख्या १०० धावांच्या पुढे नेली.

# जेम्स अँडरसनचे कसोटी क्रिकेटमधील राज्य खालसा!

## अश्विन अण्णा ठरला टेस्टमध्ये नंबर 1 गोलंदाज

।मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत मोठा बदल झाला आहे. भारताचा स्टार फिरकीपटू आर अश्विनने ताज्या क्रमवारीत अव्वल स्थान गाठले आहे. त्याने इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनला मागे टाकत नंबर-१ कसोटी अव्वलस्थान पटकावला आहे. आर अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात दमदार कामगिरी केली होती, ज्याचा त्याला ताज्या क्रमवारीत फायदा झाला आहे. ३६ वर्षीय आर अश्विन २०१५ मध्ये प्रथमच नंबर-१ कसोटी गोलंदाज बनला आणि त्यानंतर तो या खुर्चीवर अनेकदा**



**बसला आहे.**

त्याचवेळी टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह एका स्थानाच्या फायदा घेऊन चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. रवींद्र जडेजानेही स्थान मिळवले असून, तो आठव्या क्रमांकावर पोहोचला आहे. अशाप्रकारे ICC कसोटी गोलंदाजी क्रमवारीत तीन भारतीय गोलंदाजांचा टॉप-१० मध्ये समावेश करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी पाचव्या क्रमांकावर आहे.आर. अश्विन हा ८६४ गुणांसह अव्वलस्थानी पोहोचला आहे.

### अनिल कुंबळेचा हा 'विराट विक्रम' अश्विन मोडेल

» टीम इंडियाचा महान ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने तिसऱ्या कसोटी सामन्यात ९ विकेट घेतल्यास तो ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक ११२ विकेट घेणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरेल. ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताकडून सर्वाधिक कसोटी बळी घेण्याचा विक्रम अनुभवी लेगस्पिनर अनिल कुंबळेच्या नावावर आहे. अनुभवी लेगस्पिनर अनिल कुंबळेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १११ कसोटी बळी घेतले आहेत. रविचंद्रन अश्विन तिसऱ्या कसोटी सामन्यात ९ विकेट्स घेतच अनिल कुंबळेचा हा विक्रम मोडेल.

### अश्विन सर्वाधिक 5 बळी घेऊन इतिहास रचणार

» याशिवाय रविचंद्रन अश्विन भारतात खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक ५ बळी घेण्याच्या बाबतीत अनिल कुंबळेचा विक्रम मोडेल. रविचंद्रन अश्विनने भारतात खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये एकूण २५ वेळा ५ विकेट्स घेतल्या आहेत. अश्विन अजूनही या बाबतीत अनिल कुंबळेच्या बरोबरीने आहे. अनिल कुंबळेनेही भारतात खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये एकूण २५ वेळा ५ विकेट्स घेतल्या आहेत. इंदोरमध्ये रविचंद्रन अश्विनने पुन्हा एकदा ५ विकेट्स घेतल्यास तो इतिहास रचेल. असे केल्याने २६ वेळा पाच विकेट घेणारा अश्विन इतिहासातील पहिला भारतीय गोलंदाज ठरेल. रविचंद्रन अश्विनने आतापर्यंत ९० कसोटींच्या १७० डावांमध्ये ४६३ विकेट्स घेतल्या आहेत. रविचंद्रन अश्विनने ११३ एकदिवसीय सामन्यांमध्ये १५१ विकेट्स घेतल्या आहेत, तर ६५ टी२० मध्ये ७२ विकेट्स आणि आयपीएलच्या १८४ सामन्यांमध्ये १५७ विकेट्स घेतल्या आहेत.

# राष्ट्रीय बॅडिमटन स्पर्धा: मिथुन, अनुपमाला विजेतेपद

## राष्ट्रीय बॅडिमटन स्पर्धेत विजेतेपद

। पंजाब । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

रेल्वेच्या मिथुन मंजुनाथ आणि हरियाणाची अनुपमा उपाध्याय यांनी ८४व्या राष्ट्रीय बॅडिमटन स्पर्धेत विजेतेपद मिळवले. मिथुनचे एकतर्फी वर्चस्व, तर अनुपमाला विजेतेपदासाठी करावा लागलेला संघर्ष हा अंतिम लढतीच्या निर्णयातील महत्त्वाचा फरक ठरला. मिथुनने मध्य प्रदेशाच्या प्रियांशु राजावतचा२१-१६, २१-११ असा सहज पराभव केला. महिला एकेरीत अनुपमाने छत्तीसगडच्या आकर्षि कश्यपचे आव्हान २०-२२, २१-१७, २४-२२ असे तीन गेमच्या लढतीत मोडून काढले.कारकीर्दीत श्रीकांतवर दुसऱ्यांदा विजय मिळविल्यानंतर आत्मविश्वास दुणावलेल्या मिथुनने अंतिम लढतीत थॉमस चषक विजेत्या संघातील प्रियांशु राजावतविरुद्ध एकतर्फी वर्चस्व राखले. राष्ट्रीय स्पर्धेच्या उपांत्य फेरीत श्रीकांतवर विजय मिळविल्यावर मिथुनने अंतिम लढतीत विजेतेपदाच्या निर्धारानेच खेळ केला. पहिल्या



गेममध्ये आघाडीनंतर गेमच्या मध्याला एका गुणाने मागे पडल्यानंतरही उत्तरार्धात मिथुनने आक्रमक खेळ करताना प्रियांशुवर दडपण आणले आणि पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममधील मिथुनचे वर्चस्व लक्षणीय होते. मिथुनच्या वेगवान आणि आक्रमक फटक्यांना प्रियांशु उत्तर देऊ शकला नाही. दुसऱ्या गेमच्या मध्यात ११-८ अशा आघाडीनंतर मिथुनने उत्तरार्धात प्रियांशुला केवळ तीनच गुणांची कमाई करून दिली यावरूनच त्याच्या एकतर्फी वर्चस्वाची कल्पना येते.

महिला एकेरीत अनुपमाने १ तास १८ मिनिटांच्या कडव्या प्रतिकारानंतर सामना जिंकला. फटक्यांवर राखलेले अचूक नियंत्रण आणि फटक्यांची अचूक दिशा ही अनुपमाच्या खेळाची ताकद ठरली. या जोरावरच पहिली गेम गमावल्यानंतरही अनुपमाने विजेतेपद मिळवले.